एच.आय.व्ही/एड्स समुपदेशकांचे कार्य व कार्य समाधानता एक अभ्यास.
विषेश संदर्भ :- विदर्भ विभाग

स्वामी रामानंद तिर्थ, मराठवाडा विद्यापीठा, नांदेड च्या आचार्य पदवी हेतू नामांकनासाठी समाज विज्ञान विद्याशाखेतील समाजकार्य विषयात ही संशोधन रूपरेषा सादर करण्यात येत आहे.

संशोधक

रामेश्वर शिवलीग व्हंडकर

एम.एस.डब्ल्यु.,एम.फिल.,सेट,नेट

मार्गदर्शक

डॉ. मनिषा मांजरमकर

जवाहरलाल नेहरू कॉलेज ऑफ सोशल वर्क, नांदेड

स्वामी रामनंद तिर्थ, मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सन - २०१७-१८

प्रेषक

रामेश्वर शिवलींग व्हंडकर
पत्ता c/o- शंकर
शेट्टी,सातपूते
ले-आऊट, स्नेहल नगर,
वर्धा
जिल्हा वर्धा , ४४२००१

प्रति,

मा.सहा. कुलसचिव
एस.आर.टी. मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

विषय :- समाज विज्ञान विद्या शाखेतील समाजकार्य विषयात आचार्य पदवी करीता नोंदणी करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास सविनय विनंती करण्यात येते की, मला समाज विज्ञान शाखेत समाजकार्य विषयात आचार्य पदवी करीता नोंदणी करावयाची असून याकरीता आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची पूर्तत करण्यात आलेली आहे.

करीता समाज विज्ञान शाखेत आचार्य पदवी (समाजकार्य) करीता नोंदणी करण्यात यावी ही विनंती.

दि. :-

आपला विश्वासू

(रामेश्वर एस. व्हंडकर)

सहपत्र :-

अनुक्रमणीका

अ.क्र.	तपशील	पृष्ठ क्र.
१	प्रस्तावना ऐतिहासीक पार्श्वभूमी साहित्य परीक्षन	१ ते ४
२	संशोधन पध्दती :- संशोधन विषय निवडीचे महत्व अध्ययन विषयाचे स्वरूप/मर्यादा अध्ययनाचे महत्व संकल्पना	४ ते ६
३	अध्ययनाचे उद्देश :- गृहितकृत्य अध्ययन क्षेत्र अध्ययन विश्व अध्ययनाचे एकक	६ ते ८
४	संशोधन आराखडा :- नमुना निवड पध्दती तथ्य संकलन पध्दती व तंत्रे प्रश्नावली पूर्व तपासणी अनुमापन तंत्रे	८ ते ९
५	अहवाल लेखन व प्रकरणी करण	९
६	संदर्भ ग्रंथ सूची	१०

एच.आय.व्ही/एड्स समुपदेशकांचे कार्य व कार्य समाधानता एक अभ्यास.
विषेश संदर्भ :- विदर्भ विभाग

मानवी जिवनाचा इतिहास अभ्यासता विविध टप्प्या टप्प्यांनी मानवाचा विकास झाल्याचा आढळतो. इतर सर्व प्राण्यांच्या तुलनेत मानव हा अधिक बुध्दीजीवी प्राणी आहे.असे आढळते. मानव समाजाचा विकास लक्षात घेता वेळोवेळी सामाजिक, वैयक्तीक स्थितीमध्ये बदल होत गेल्याचे दिसुन येते. यामध्ये सुरूवातीला मानव एकटा राहात असे यात बदल घेऊन दिवसेदिवस तो समुहाने राहाणे पसंद करू लागला. समुहातुन आपल्या गरजा परस्पर सहाय्यातुन पुर्ण करू लागला या प्रमाणे व्यक्ती आपल्या जीवनात आधुनिकता प्रस्थापीत करू लागला. भारतीय नागरीकांचा विचार करता भारतात अनेक समाजातील व्यक्तीचा एकत्रीत समुह पाहावयास मिळतात. निसर्ग नियमानुसार प्रत्येक व्यक्ती ही भिन्न असते.त्यामुळे प्रत्येक व्यक्ती ही समायोजीत विकास प्रक्रीयेत सामावेलच असे नाही. तर अनेक अशा व्यक्ती असतात की ज्यांना योग्य समायोजन साधता येत नाही. अशा व्यक्ती त्यांच्या जिवनात निर्माण होणाऱ्या लहाण मोठया समस्यांवरून असमायोजीत होऊन त्याचा विपरीत परिणाम त्यांच्या जिवनावर होतो. अशावेळी त्यांना योग्य मदत करणारा, मार्गदर्शन करणारा, सल्ला देणारा तसेच आधार देणारा आवश्यक असतो. व्यक्ती जीवनामध्ये अनेक स्वरूपाच्या अडचणी समस्या उद्भवत असतात. यामध्ये आर्थिक अडचणी, सामाजिक अडचणी, कौटुंबिक अडचणी तसेच वैयक्तीक जिवनाशी आरोग्य विषयक समस्या उद्भवत असतात.अशावेळी योग्य सल्ला ,योग्य मार्गदर्शन मिळणे महत्वाचे असते. अशा व्यक्तीना वेळोवेळी अचुक मार्गदर्शन करण्याचे कार्य समुपदेशक करत असतात. यामध्ये वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळी भुमीका समुपदेशक पार पाडत असतात. ती म्हणजे कौटुंबिक कलह, कायदेविषयक, विवाह संबंधी, आरोग्य विषयक अशा विविध प्रकारे समुपदेशक आपली भुमीका पार पाडत असतात.

मानवाने जसजशी प्रगती साध्य केली तसतसे त्याला अडथळा निर्माण करणारे काही नवनवीन प्रश्न उभे होत गेले. यामध्ये आरोग्य विषयक स्थिती लक्षात घेता विकासाच्या प्रगतीवर अनेक आजारांवर नवनवीन औषधी शोधली तर दुसरीकडे व्यक्तीच्या बदलत्या जिवन पध्दतीमुळे अनेक नवीन रोग आढळुन आले. या पैकी एक म्हणजे एच.आय.व्ही/एड्स हा होय. या आजाराचा पहिला रूग्ण १९८२ ला अमेरिकेत तर १९८६ ला भारतात सापडला. त्यानंतर दिवसेदिवस याचे प्रमाण वाढतच गेले. याकरीता एच.आय.व्ही/एड्स नियंत्रणात आणण्याकरीता राष्ट्रीय ,आंतराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न सुरू झाले. भारतात एच.आय.व्ही/एड्स नियंत्रणाकरीता ''राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटना'' राष्ट्रीय स्तरावर तर महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी ही राज्यस्तरावर कार्यरत आहे. या अंतर्गत एच.आय.व्ही/एड्स नियंत्रणाचे कार्य केल्या जाते. या करीता समुपदेशकांची मदत घेतली जाते.

विषयाची ऐतिहासीक पार्श्वभूमी :-

एच.आय.व्ही. हा एक विषाणू आहे. या विषाणूची लागण झालेल्या व्यक्तीला काही कालावधी नंतर एड्स म्हणजे ''अकवायर्ड इम्यूनो डिफिशियेंसी सिंड्रोम'' होतो. एच.आय.व्ही. विषाणूच्या संसर्गामूळे एड्स होतो. या मध्ये व्यक्तीची नैसर्गिक रोग प्रतिकार शक्ती निकामी

होत जाते. एड्स हा रोग नाही पण एक शारीरीक स्थिती आहे. एड्स झालेल्या मानसाला इतर संसर्गजन्य रोगांची सहज लागण होऊ शकते. एच.आय.व्ही. रक्तातील रोगप्रतिकार पेशी लिम्फोसाईट्सवर आक्रमण करतात. एड्स पीडीतांच्या शरीरातील रोगप्रतिकार क्षमता हळूहळू कमी होत गेल्याने सर्दी, खोकल्यासारखे साधे तसेच क्षयासारखे भयंकर रोग होणे शक्य असते. त्यांवर इलाज करणे ही अवघड होते. एच.आय.व्ही. ने ग्रस्त व्यक्ती अनेक वर्षापर्यंत काहीही लक्षणा शिवाय राहू शकते.

एड्स वर्तमान काळातील सर्वात मोठया स्वास्थ समस्ये पैकी एक आहे. एड्सच्या संसर्गाची तीन मुख्य कारणे आहेत.

१) असुरक्षित लैंगिक संबंध.

२) बाधित रक्तातून.

३) बाधित आई कडून अर्भकास

४) निर्जंतूक इंजेक्शन सुया व सिरीज मुळे

नॅशनल एड्स कंट्रोल प्रोग्रॅम आणि यू.एन.एड्स यांच्या नुसार भारतात ८० ते ८५ टक्के संसर्ग असुरक्षित विषम लैंगिक (हि ट्रोसे कशुअल) संबंधातून पसरत आहे. भारतात आजपर्यंत एड्सकडे आवश्यकत्या प्रमाणात लक्ष देऊनही एच.आय.व्ही. एड्सच्या रग्णतेत अपेक्षित घट झाल्याचे दिसून येत नाही.

एच.आय.व्ही. विषाणू पहिल्यांदा अफ्रिकेतील खास प्रजातीच्या माकडात सापडला आणि तेथूनच सगळया जगात पसरला असे मानले जाते. इ.स. १९८१ मध्ये सुमारे ५ कोटी लोक एड्सचे बळी ठरले आहेत असा अंदाज होता.

एड्स हा आजार जागतिक समस्या आहे. भारतात एड्स आजाराच्या रूग्णाकडे पाहण्याचा सामाजिक दृष्टीकोण ही एक मोठी समस्या आहे. कॉलरा, विषमज्वर, मलेरीया, क्षयरोग, कर्करोग इ. आजार हे उपचार व शस्त्रक्रियांव्दारे पुर्णबरे होऊ शकतात. अशा रूग्णांकडे आपण सहजतेने पाहतो. मात्र तितक्याच सहजतेने एड्स रूग्णांकडे पाहण्याचा दृष्टीकोन ठेवलातरच समस्या सुटू शकेल. त्यासाठी आपण आपल्या धोरणात नवी दिशा, नवी गती, सामाजिक व मानसिक दृष्टीकोन ठेवून मानवतावादी व्यवहार केला पाहीजे.

मानवी आरोग्य व जगण्याचा अधिकार मिळावा आणि एड्स या जीवघेण्या रोगाबदल जगभर जनजागृती व्हावी यासाठी १ डिसेंबर जागतिक एड्स दिवस म्हणून पाळला जातो. ऑगस्ट १९८७ मध्ये जेम्स डब्ल्यू. बॅन आणि थॉमस नेटर या दोघांनी वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन जिनेव्हा (स्वित्झरलॅड) येथील जागतिक कार्यक्रमात याची संकलपना मांडली. डॉ. जॉनथन मान (एड्स ग्लोबलचे संचालक) यांच्या सहमतीनंतर १ डिसेंबर १९८८ पासून जागतिक एड्स दिन म्हणून पाळला जातो. या वर्षाचे शासनाचे घोषवाक्य आहे. ''माझे आरोग्य माझा अधिकार.''

१९८१ मध्ये एड्स या आजाराची ओळख झाली. लॉस एंजिलीसचे डॉक्टर मायकल गॉटलीब यांच्या निर्दशनास आले की, पाच पेशंटमध्ये वेगवेगळया प्रकारचा न्यूमोनिया दिसला.

या सर्व रूग्णाची प्रतिकारशक्ती अचानक कमजोर होऊ लगली. हे पाचही रूग्ण समलैंगिक होते. त्यामुळे सुरूवातीला डॉक्टरांना वाटले हा आजार फक्त समलैंगिक लोकांमध्ये आहे. म्हणून एड्सला ग्रीड म्हणजे गे रिलेटिड इम्यून डेफिशियन्सी असे नाव देण्यात आहे. पण दुसऱ्या रूग्णांमध्ये सुध्दा या आजाराचे विषाणू मिळू लागले. तेव्हा चुकीची धारणा आहे असे वाटू लागले. त्यामुळे १९८२ मध्ये ग्रीड चे नाव बदलून एड्स म्हणजे एकवायर्ड इम्यूनो डेफिशियन्सी सिंडोम असे ठेवण्यात आले. प्रतिकार शक्तीच्या अभावाने प्राप्त झालेल्या अनेक रोग लक्षणांच्या एकत्रिक समूह म्हणजे एड्स होय. १९९१ साली पहिल्या वेळेस लाल फित (रेड रिबन) आंतरराष्ट्रीय जनजागृतीचे एड्सचे प्रतिक मानले गेले. एड्समूळे मृत्यृ पावलेले त्यांना श्रध्दांजली हानीग्रस्त झालेले त्यांना आधार ज्यांना झळ पोहोचली अशांना त्यांच्याशी दृढ सामाजिक बांधिलकी म्हणून लाल फित लावली जाते.

एच.आय.व्ही. विषाणू शोध :-

सन १९८३ मध्ये डॉ. ल्यूक मोण्टिग्रेयर (फ्रेच) आणि डॉ. रॉबट गॅलो (अमेरीकन) शास्त्रज्ञाने एच.आय.व्ही. विषाणूचा शोध लावला. १९८६ मध्ये पहिल्यांदाच या विषाणूला एच. आय.व्ही. म्हणजे हयुमनो डेफिशिएंसी वायरस हे नाव दिले. भारतात १९८६ साली चेन्नई (मद्रास) मुंबई मध्ये एच.आय.व्ही. चा रूग्ण आढळला.

भारतात ही एड्सचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. पुरेशा आरोग्य सेवा नसल्याने तसेच डॉक्टरांच्या व जनतेच्या योग्य आरोग्य शिक्षणा अभावी त्याचा प्रसार आटोक्यात आणणे आपल्या देशात कठीण जात आहे. सर्वानाच या आजाराची माहिती असणे आवश्यक आहे. एच.आय.व्ही. किंवा एड्स तपासणी व पुढील उपचार करण्यासाठी माहितगार समुपदेशकांची गरज असते. एच.आय.व्ही. तपासणी सदोष (पॉझिटीव्ह) आहे हे रूग्णाला सांगणे हे फार जबाबदारीचे व कौशल्याचे काम आहे. यामुळे जाणकार व्यक्तीला प्रचंड मानसिक धक्का बसू शकतो. पण काय करता येते याबदल निट माहिती टप्प्या टप्प्याने द्यायला हवी. आजार लगेच होत नाही. त्याला अद्याप वेळ आहे हे ही सांगायला हवे.

बाधित व्यक्तीच्या पती-पत्नीस (किंवा लैंगिक जोडीदारास) या संसर्गाची/आजाराची बातमी देणे आवश्यक आहे. अन्यथा प्रतिबंधक काळजी घेताच येणार नाही. मात्र हे सांगतांना मानवी सहानुभूती, धीर देणे, योग्य काळजी घेण्यासाठी (निरोध) नीट सल्ला देणे इ. अनेक अंगे सांभाळावी लागतात. तसेच हा दुर्धर व सामाजिक दृष्टया हिन मानला जाणारा आजार असल्याने अशा रूग्णास मानसिक आधार देणे खूप महत्वाचे असते जो समुपदेशक देऊ शकतो.

शासन स्तरावर एच.आय.व्ही./एड्स बाधितांना न्याय :-

एच.आय.व्ही. बाधितांसाठी हक्काचे संरक्षण मिळण्यासाठी शासनाने एच.आय.व्ही. /एड्स (प्रतिबंध व नियंत्रण) विरोधक २०१४ मध्ये दुरूस्ती प्रस्तावाला हिरवा कंदील दाखविण्यात आला आहे. या दुरूस्तीनुसार एच.आय.व्ही. ग्रंस्तांना शिक्षण, रोजगार, वैद्यकिय उपचार, निवास यामध्ये भेद भावाची वागणूक देणाऱ्या व्यक्ती व संस्थाविरूध्द कार्यवाहीची तरतूद करण्यात आली आहे.

एच.आय.व्ही./एड्स विषयी समुपदेशन :-

समुपदेशन ही एक दिर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. एखाद्या व्यक्तीला काही समस्या असेल किंवा आजारा विषयी वैचारीक गोंधळ असतो त्यासाठी त्याला दुसऱ्यांच्या मार्गदर्शनाची गरज भासते. कारण समस्या ग्रस्त व्यक्तीला तिचे निराकरण करून घेण्यासाठी मनोधैर्य त्या व्यक्तीकडे नसते. समुपदेशकाच्या माध्यमातून समुपदेशन करून एच.आय.व्ही./एड्स कशामुळे होतो. कशामुळे होत नाही. या विषयी माहिती सांगितली जाते. तर एखादी व्यक्तीची एच.आय. व्ही./एड्स चाचणी पॉझीटीव्ह आली असेल तर त्याचे मानसिक संतूलन नबिघडता पुढील जिवन जगण्यासाठी धिर देणे, या आजाराने विषाणूची वाढ होऊ नये म्हणून ए.आर.टी. उपचार पध्दती विषयी माहिती सांगणे व नियमित उपचार इ. माहिती सांगून या आजाराचे रूग्णांना व त्याच्या परिवाराला मानसिक व सामाजिक सहानुभूती दाखविणे हे कार्य समूपदेशक करत असतात.

एकात्मीक समूपदेशन आणि तपासणी केंद्र समूपदेशकांचा इतिहास :- भारतात एकात्मीक समूपदेशन आणि तपासणी केंद्र समूपदेशकांची सुरवात १९९७ मध्ये झाली. सध्य परीस्थितीत जवळपास २०१६ च्या आकडेवारीनुसार २०,७५६ समूपदेशक शासकीय रूग्णालयात कार्यरत आहेत.

साहित्य परीक्षण :-

एच.आय.व्ही./एड्स समुपदेशकांचे एकंदरीत कार्य समजून घेण्यासाठी संशोधक वेगवेगळया साहित्याचा आधार घेऊन संशोधन कार्य पुर्णत्वास नेणार आहे. यामध्ये या विषयाबाबत संशोधकाने पुर्वीचे एम.फिल. पदवी करीता केलेले संशोधन साहित्य परीक्षण म्हणून विचारात घेऊन सदर संशोधन कार्य पुर्ण करणार आहे. तसेच या विषया संबंधीत इतर काही संशोधकांना संशोधन कार्य केले आहे काय? ते शोधून त्यासंबंधीच्या निष्कर्ष सुचना शिफारशी विचारात घेऊन यामध्ये त्यापेक्षा नाविन्यता कशी आनता येईल याकरीता हे संशोधन तसेच इतर नॅकोचा व एम.सॅक. यांचे विविध एच.आय.व्ही./एड्स बाबतचे अहवाल आकडेवारी विचारात घेऊन संशोधन कार्य केले जाईल.

एच.आय.व्ही./एड्स या विषयाशी संबंधीत समूपदेशकाची मार्गदर्शक पुस्तीका, विविध प्रशिक्षण सुचनाबुक तसेच इतर या संबंधीत काही साहित्याचा वापर करूण सदर संशोधन कार्य पुर्ण केले जाणार आहे. त्या सोबतच नागपूर विद्यापिठा अंतर्गत प्रा. भिमराव मेश्राम यांनी एच.आय.व्ही./एड्स संबंधीत आचार्य पदवी करीता संशोधन कार्य केलेले आहे त्याचा ही साहीत्य परीक्षण म्हणून विचार केला जाईल. अशा विविध साहीत्याचा आढावा घेऊन सदर संशोधनात नाविन्यपुर्णता: आणली जाईल.

संशोधन विषय निवडीचे महत्व :-

समुपदेशकाकडुन दिल्या जाणाऱ्या सेवा या वेगवेगळया क्षेत्रातील असतात. जसे कौटुंबिक समुपदेशन, विवाहपुर्वक समुपदेशन विवाह पश्चात समुपदेशन, व्यावसायीक समुपदेशन तसेच एच.आय.व्ही/एड्स समुपदेशन या अनेक प्रकारे समुपदेशन करून अशा समस्या ग्रस्त व्यक्तीची समस्या सोडवण्याचा प्रयत्न समुपदेशकांकडुन केला जातो. परंतु

संशोधकास असे निदर्शनास आले की, ज्या व्यक्तीवर अनेक व्यक्तीच्या समस्या सोडवण्याचा बोझा आहे अशा व्यक्तीला योग्य कार्य करण्यसाठी पोषक असे वातावरण निर्मीती करता येईल यासाठी योग्य परिस्थिती प्राप्त आहे का? समुपदेशकाच्या कार्यातुन अशिलाची समाधानता लक्षात घेतली आहे, हे लक्षात घेणे तेवढेच महत्वाचे असते. अनेक क्षेत्रातील समुपदेशकापैकी एक महत्वाचा व जागतीक स्तरावरील समस्या सोडवण्यासाठी कार्यरत असणारा स्थानीक व्यक्ती कर्मचारी म्हणजे एच.आय.व्ही/एड्स समुपदेशक होय या व्यक्तीचीच समस्या सोडवण्यासाठी किंवा या व्यक्तीची परिस्थिती समजुन घेणे तेवढेच महत्वाचे आहे. जेवढे या व्यक्ती कडुन गुणात्मक कार्याची अपेक्षा केली जाते.

एच.आय.व्ही/एड्स समुपदेशन कार्यात समुपदेशकाला वेगवेगळया स्थानी वेगवेगळे समुपदेशन करून त्या रूग्णाला अशिलाचा शेवटपर्यत पाठपुरावा करावा लागतो व त्याप्रमाणे तो आपले कर्तव्य पार पाडत असतो.परंतु समुपदेशकांची सदयाची परिस्थिती असे कार्य करण्यासाठी योग्य प्रमाणात पोषक वातावरण न मिळणारे आहे त्याच्या कर्तव्यापासुन तो दुर जात आहे हे जाणुन घेणे व त्या कामाविषयी समुपदेशकांची कार्य समाधानता लक्षात घेणे तेवढेच महत्वाचे आहे.

समुपदेशक हा स्वत:च्या कार्यात असंतुष्ट असल्याचे आढळते समुदेशक हा असमाधानी असल्यामुळे आपले कर्तव्य पुर्ण करत नाही असे आढळते त्यामुळे अनेक लाभार्थी या पासुन समाधानी होत नाही व मुळ उद्देशपुर्ण होत नाही. नॅको आणि एम.सॅक यांचा मुळ उद्देश समुपदेशक किती प्रमाणात साध्य करतात या संबंधीत संशोधकाला माहिती प्राप्त करावयाची आहे त्या करीता हा संशोधन विषय निवडला आहे.

अध्ययन विषयाचे स्वरूप/मर्यादा :-

प्रस्तुत अध्ययनाची व्याप्ती ही महाराष्ट्र राज्यातील नागपुर व अमरावती हे दोन प्रशासकीय महसुल विभाग कार्यक्षेत्रात कार्यरत महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी अंतर्गत येणारे समुपदेशक यांचे कार्य कर्तव्य तसेच कार्याबाबत त्याची प्रेरणा उत्सुकता व कार्य समाधानता जाणुन घेणे हे आहे. या संशोधन विषयातुन समुपदेशकाच्या वैयक्तीक अनावश्यक बाबीवर कोणताही हस्तक्षेप केला जाणार नाही. तसेच एच.आय.व्ही/एड्स संबंधीत व्यक्तीची माहिती किंवा त्याच्या कार्यात्मक अकुशलपणा या बाबत कोणतीही गोपनीय माहिती घेतली जाणार नाही ही संशोधनांची मर्यादा राहील. समुपदेशन प्रक्रिया योग्य चालते का? समुपदेशक कार्यकुशल आहेत का प्रत्यक्षात समुपदेशक या पदावर कार्य करणारे व्यक्ती किती कार्य समाधानी आहेत याचा अभ्यास केला जाईल पंरतु तो एक अभ्यासाचा भाग म्हणुन अभ्यासला जाईल याचा कोणताही गैर वापर केला जाणार नाही. तसेच कोणतीही एच.आय.व्ही/एड्स संक्रमीत माहिती या अभ्यासातुन प्राप्त केली जाणार नाही. रूग्ण व समुपदेशक यांना हानी पोहोचेल असे कोणतेही कार्य या संशोधनातुन केले जाणार नाही. तसेच वेळेची मर्यादा लक्षात घेऊन संशोधन कार्य पुर्ण केले जाईल.

संशोधन विषयाचे महत्व /अध्ययनाचे महत्व :-

एच.आय.व्ही/एड्स समुपदेशकांचे कार्य व कार्य समाधानता विषयी प्राप्त माहिती अध्ययन पुर्ण झाल्यानंतर प्राप्त निष्कर्ष व सुचना शिफारशी या एम.सॅक. तसेच डापको कार्यालयासाठी नवीन सुधारीत योग्य धोरण ठरवण्यासाठी याचा वापर घेऊ शकतो. तसेच महत्वाचा भाग म्हणजे या समुपदेशका कडुन भविष्यात गुणवत्ता पूर्ण कार्य प्राप्त करण्यासाठी काम करणे आवश्यक राहिल हे यातुन सांगता येईल.

समुपदेशन कार्यातील गुणवत्ता वाढवण्यासाठी समुपदेशकांना कार्य समाधानी ठेवणे आवश्यक आहे. जर कोणताही कर्मचारी संबंधीत कार्याबाबत असमाधानी असेल तर तो संख्यात्मक कार्य करेन परंतु गुणात्मक गूणवत्ता पुर्ण कार्य करणार नाही. या करीता समुपदेशकांची कार्यात्मक समाधानता वाढवुन गुणात्मक कार्यात वाढ करण्यासाठी प्रयत्न केला जाईल. हे या अभ्यासाचे महत्व राहील.

संकल्पना :-

संशोधकाने संशोधन विषयात वापरलेल्या संकल्पना कोणकोणत्या अर्थानेच वापरल्या आहेत त्या खालीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत. संकल्पना दोन प्रकारे मांडल्या जातात.

१) औपचारीक व्याख्या :-

यामध्ये इतर शास्त्रज्ञ, वैज्ञानीक व तज्ञ व्यक्तीच्या व्याख्यांचा समावेश केला जातो संबंधीत संशोधन विषयावर इतरांनी मांडलेले मते जे की संकल्पना स्वरूप अमुर्त घटकावरून आवश्यक त्या स्थितीचा बोध करून देतात.

२) कार्याभिमुख किंवा व्यावहारीक व्याख्या :-

व्यावहारीक व्याख्या संबंधीत ब्रिजमन यांनी लिहिले की “ संकल्पनेचा वास्तवीक अर्थ कोणता हे पहावयाचे असेल तर व्यक्ती त्या संकल्पनेबाबत काय बोलते याकडे लक्ष देण्यापेक्षा व्यक्ती ती संकल्पना कशी वापरते हयाचा शोध घेणेच जास्त उपयुक्त ठरते.”म्हणजेच कार्याभिमुख व्याख्यामध्ये प्रत्यक्ष कृतीला अधिक महत्व दिले जाते. थोडक्यात कार्याभिमुख व्याख्येचा अर्थ हा आहे की संकल्पनेचा अर्थ शब्दात नसुन ती कृतीत असतो.

१) एम सॅक (एम.एस.ए.सी.एस.)

“राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थे अंतर्गत कार्यरत असणारी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रणाचे कार्य करणाऱ्या काही व्यक्तीचे व्यवस्थापन म्हणजे एम.सॅक होय.”

“महाराष्ट्र राज्य अंतर्गत एच.आय.व्ही/एड्स नियंत्रण करण्यासाठी काम करणाऱ्या व्यक्तीचा समुह म्हणजे एम.सॅक. होय”

२) एच.आय.व्ही/एड्स समुपदेशक :-

"हयुमन इमुनो डेफिशियन्सी व्हायरस व एड्स या संबंधीत व्यक्तीना योग्य माहिती देणारा व्यक्ती जो की, एम.सॅक कडुन ठराविक मानधन घेऊन काम करतो.''

३) एच.आय.व्ही/एड्स :-

"एच.आय.व्ही म्हणजे असा विषाणु होय की जो, व्यक्तीची रोग प्रतिकार शक्ती कमी करूण अशा व्यक्तीला अनेक रोगास बळी पाडण्यास अनुकुल वातावरण तयार करतो.''

४) एड्स :-

"एड्स म्हणजे अनेक रोगांनी एकत्रीत ग्रासलेली व्यक्ती होय.''

एच.आय.व्ही ग्रस्त अशी व्यक्ती होय की ज्याला अनेक रोगांनी ग्रासले असुन उपचार घेऊन ही तो बरा होवु शकत नाही त्यास एड्स म्हणतात.

५) कार्य :-

"कार्य म्हणजे असे काम की जे ,त्या पदावरील प्रत्येक व्यक्ती ने करणे आवश्यक समजले जाते.''

६) कार्य समाधानता :-

"कार्य समाधानता म्हणजे काम करणारी व्यक्ती ज्या पदावर आहे. त्या पदाची कार्य कर्तव्य व जबाबदाऱ्या पुर्ण करून त्यातुन ती मानसिकरीत्या आनंदी समाधानी आहे.''

या प्रमाणे संशोधकाने काही व्यावहारीक व्याख्यांच वापर केलेला आहे.

अध्ययनाचे उद्देश :-

संशोधन विषयाची सविस्तर माहिती मिळवण्यासाठी संशोधकर्ता प्रयत्नशिल असतो. ती माहिती कोणती मिळवावी या करीता संशोधक आपले उद्देश निश्चित करत असते संशोधकाच्या मनात संशोधन विषयासंदर्भात निर्माण झालेले प्रश्न लक्षात घेऊन संशोधक आपले उद्देश निश्चित करत असतो. संशोधन कार्याला योग्य दिशा देण्याकरीता उद्देश निश्चित करणे आवश्यक असते. सदर संशोधन विषयाचे उद्देश खालील प्रमाणे आहेत.

१) एच.आय.व्ही/एड्स समुपदेशकांच्या कार्याचा अभ्यास करणे.

२) समुपदेशकांना मिळणाऱ्या सेवा सुविधा बाबत समाधानता स्थिती अभ्यासणे.

३) समुपदेशकांची आपल्या कर्तव्याबद्दलची तत्परता अभ्यासणे.

४) नॅको व एम.सॅक यांचे एच.आय.व्ही/एड्स बाबतचे धोरण ठरवताना समुपदेशकांचा सहभाग परीक्षण करणे.

५) समुपदेशक व लाभार्थी यांचे सहसंबंध अभ्यासणे.

६) समुपदेशक व लाभार्थी विरूध्द लिंगी असतानाची समुपदेशन स्थिती अभ्यासने.

गृहितकृत्य :-

संशोधन विषयासंबंधीत संशोधकास माहित असणाऱ्या बाबीवर संशोधकाच्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांच्या संभाव्य उत्तरास किंवा अर्थपुर्ण विधानास गृहितके असे म्हणतात. संशोधक त्याला असणाऱ्या ज्ञानावरूण,अनुभवावरूण हे गृहितके मांडत असतो. सदर संशोधन कार्यासाठी खालील प्रमाणे संशोधकाने गृहितके मांडले आहे.

१) समुपदेशक एच.आय.व्ही/एड्स नियंत्रणासाठी आवश्यकते कार्य करतात.

२) एच.आय.व्ही/एड्स समुपदेशकांना मिळणाऱ्या सेवा सुविधाबाबत ते असमाधानी आहे.

३) समुपदेशक आपल्या कर्तव्याबदल तत्पर आहे.

४) नॅको व एम.सॅक. यांच्याकडून एच.आय.व्ही/एड्स नियंत्रणाचे धोरण ठरवतांना समुपदेशकांना विचारात घेत नाहीत.

५) समुपदेशकांचे कार्य समाधानता व गुणवत्तापुर्ण कार्य यांचा सम सहसंबंध आहे.

६) समुपदेशक व लाभार्थी यांचे स्नेह पुर्ण सहसंबंध कायम जोपासले जातात.

७) समुपदेशक व लाभार्थी विरूध्द लिंगी असताना समुपदेशन कार्यावर प्रतिकुल परिणाम होतो.

अध्ययन क्षेत्र :-

प्रस्तुत संशोधन विषयाचे अध्ययन क्षेत्र हे महाराष्ट्र राज्यातील विदर्भ प्रांत राहिल. या भागातील एकुण ११ जिल्हयांचा समावेश सदर संशोधन कार्यात केला जाईल. या जिल्हातील एकुण एच.आय.व्ही./एड्स समुपदेशकांचा समावेश यात केला जाईल.

अध्ययनाचे विश्व:-

सदर संशोधन विषयाचे अध्ययन करण्याकरीता अध्ययनाचे विश्व म्हणुन संशोधन कर्त्याने महाराष्ट्र राज्यातील विदर्भ भागात समाविष्ट असणारे एकुण एम सॅक अंतर्गत कार्यरत असणारे एच.आय.व्ही/एड्स समुपदेशक हे राहतील यामध्ये सी.सी.सी., समुपदेशक एस.टी.आय., आय.सी.टी.सी. समुपदेशक, ए.आर.टी. समूपदेशक यांचा समावेश केला जाईल. हे सर्व समुपदेशक मिळुन अध्ययनाचे विश्व राहील.

अध्ययनाचे एकक :-

प्रस्तुत अध्ययन विषयाकरीता नागपुर व अमरावती हे प्रशासकीय विभाग विचारात घेऊन एकुण विदर्भाचा अध्ययन विश्वाकरीता निवड केली असुन या विश्वातील महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी (एम सॅक) अंतर्गत कार्यरत असणारे एकुण समुपदेशक हे अध्ययनाचे विश्व राहिल. तर या विश्वातील प्रत्येक समुपदेशक म्हणजे अध्ययनाचे एक एकक

मानले जाईल. या प्रमाणे माहिती प्राप्त करूण प्रत्येक समुपदेशकापर्यंत जाऊन त्याचा एकक म्हणुन सदर संशोधन विषयात समावेश केला जाईल.

संशोधन आराखडा:-

संशोधन कार्यातील भविष्यातील उद्देशांना लक्षात घेऊन संशोधन आराखडा तयार केला जातो. संशोधन कार्याची योजना आखणे म्हणजेच संशोधन आराखडा होय. यामुळे संभाव्य धोके टाळले जातात. तसेच व्यर्थ वेळ, श्रम वाया जात नाही. या संशोधन कार्यात सदर विषयावर सविस्तारपणे अभ्यास करूण ज्ञान वृध्दी करणे वस्तुनिष्ट माहिती जमा करूण समुपदेशकासंबंधी वास्तविक माहिती मांडली जाईल. म्हणजेच सदर संशोधन कार्यास वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरला जाईल.त्या सोबतच प्राप्त निष्कर्ष, सुचना शिफारशी यांचा योग्य त्या कार्यासाठी वापर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील. यावरूण असे सांगता येईल की काही प्रमाणात निदानात्मक संशोधन आराखडा म्हणुन यात वापरला जाईल.

नमुना निवड पध्दती :-

नमुना पध्दती त्याच्या नावा प्रमाणेच समग्रावरूण नुमना निवड पध्दती निश्चित होते सदर संशोधन विश्व हे अतिव्यापक स्वरूपात विस्तृत नसल्याने या संशोधनाकरीता प्रत्येक एककाची निवड करूण अध्ययन करण्याचे ठरवले आहे. म्हणजेच यात जनगणना पध्दतीचा वापर करून अध्ययन करण्याचे ठरवले आहे. यालाच संपुर्ण चौकशी तंत्र असे म्हणतात.

या संशोधन कार्यात पॅरामेट्रिक नमुना निवड पध्दतीची निवड करण्यामागील वैज्ञानिक कारण म्हणजे अध्ययन क्षेत्रातील प्रत्येक एककाच्या मतांचा समावेश या संशोधनात केला जाईल. त्यामुळे अधिकाधिक वैज्ञानिक माहिती संशोधकास प्राप्त होईल. तसेच समान संधीच निपक्षपातीपणे एककांची निवड या पध्दतीमुळे केली जाते. या करीता या संशोधन कार्यास संशोधकाने या नमुना निवड पध्दतीची निवड करण्याचे ठरवले आहे.

तथ्य संकलन पध्दती व तंत्रे :-

सदर संशोधन विषयाच्या तथ्य संकलन करण्याकरीता संशोधक हा प्राथमिक तथ्यसंकलन पध्दती व द्वितीय तथ्य संकलन पध्दती या दोन्हीचा वापर करणार आहे.

प्राथमिक तथ्य संकलन पध्दतीमध्ये तथ्य संकलन करण्याकरीता प्रश्नावली या तंत्राचा वापर करण्यात येईल. या तंत्राची निवड करण्यामागील उद्‌देश म्हणजे संशोधकाचे उत्तरदाते हे दुरवर पसरलेले आहेत. तसेच सर्व उत्तरदाते हे शिक्षित आहेत.यामुळे प्रश्नावली या साधनाच्या आधारेप्रत्यक्ष तथ्य संकलन केले जाईल. द्वितीय तथ्य संकलन पध्दतीमध्ये संशोधक पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे ,एम.सॅक. ची प्रसारीत प्रसिध्द माहिती व लिखीत साहित्य यांचा समावेश यामध्ये करणार आहे. या प्रमाणे प्राथमिक व द्वितीय तथ्यांचा वापर करूण संशोधन कार्य पुर्णत्वास नेले जाईल.

प्रश्नावली पुर्व तपासणी:–

प्रस्तुत संशोधनासाठी तथ्य संकलना करीता तयार करण्यात येणाऱ्या प्रश्नावलीची प्रथम पुर्व तपासणी केली जाईल. या करीता वर्धा जिल्हयातील ५ ते ६ एच.आय.व्ही/एड्स समुपदेशकाकडुन तयार केलेली प्रश्नावली प्रायोगीक स्वरूपात भरूण घेऊन त्याबाबत प्रश्नांचा क्रम ,त्याशिवायची काही माहिती किंवा अधिकची अनावश्यक माहिती कमी करणे या प्रमाणे काही सुचना व प्रतिक्रिया घेऊन संशोधक प्रश्नावलीत योग्य तो बदल करूण त्याला अंतीम स्वरूपे देईल. त्या नंतर तथ्य संकलन केले जाईल.

अुनमापण तंत्रे :– प्रस्तुत अध्ययनात उत्तरदात्यांच्या अभिवृत्तीचे/मतांचे अध्ययन करण्यासाठी अनुमापण तंत्राचा उपयोग करण्यात येईल. संशोधनामध्ये बऱ्याचदा काही प्रश्नांचे उत्तर होय अथवा नाही अशा पध्दतीने देता येत नाही तर उत्तरदाची परिणामकारकता मोजण्यासाठी विविध अनुमापण तंत्राचा उपयोग करण्यात येतो. यामध्ये ३ अंकन, ५ अंकन तंत्राचा उपयोग केला जाईल. तसेच आवश्यकतेनुसार सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी आवश्यकतेनुसार (एस.पी.एस.एस.) अज्ञावलीचा ही वापर करून निष्कर्ष काढण्यात येतील.

अहवाल लेखण व प्रकरणीकरण :–

संशोधन विषयाच्या उद्देशांना समोर ठेऊन तसेच समाजकार्य संशोधन पध्दतींच्या पायऱ्यांचा प्रत्यक्षरित्या वापर करून तथ्य संकलन केले जाईल व त्या आधारे निष्कर्षाचे सादरीकरण तसेच सुचना शिफारशींची मांडणी किंबहूना संशोधन विषयात अध्ययनाची अद्यावत माहिती या सर्व घटकांना अग्रक्रम देवून संशोधका कडून अहवाल लेखन करून खालील प्रमाणे प्रकरणीकरण करण्यात येईल.

प्रकरण पहीले – प्रस्तावना, ऐतिहासीक पार्श्वभूमी, साहित्य परीक्षण.

प्रकरण दुसरे – अध्ययन पध्दती.

प्रकरण तिसरे – सारणीकरण व विश्लेषण.

प्रकरण चौथे – गृहितकृत्यांची पडताळणी व सामान्य निष्कर्ष

प्रकरण पाचवे – ठळक निष्कर्ष व सुचना शिफारशी

परीशिष्टे – प्रश्नावली

संदर्भ ग्रंथसूची

संदर्भ ग्रंथसुची:-

१) पवार बी.एस., चौधरी जी.बी.,''समूपदेशन मानसशास्त्र''(२०१२) प्रशांत प्रकाशन, जळगाव.

२) कऱ्हाडे बि.एम.,''शास्त्रीय संशोधन पध्दती''(२००७) पिंपळापुरे ॲण्ड कंपनी प्रकाशन, नागपूर

३) आगलावे प्रदिप,''संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे''(२०००) विद्या प्रकाशन, नागपूर

४) देशपांडे चंद्रशेखर,''समुपदेशन शास्त्रीय प्रक्रिया व उपयोजन''(२०११) उन्मेष प्रकाशन,पुणे

५) मेश्राम सुरेश,''प्रात्याक्षिक सामाजिक संशोधन''(२०००) कृष्णचंद्र एजन्सीज, लक्ष्मीनगर,नागपूर

६) एच.आय.व्ही. समुपदेशन आणि तपासणी परीक्षण साधन पुस्तीका-नॅको आणि एम.सॅक.

७) आरोग्य संवर्धन.

८) www.naco.gov.in

9) www.arogyavidya.net

10) www.mahanews.gov.in

11) www.vikaspedia.in

12) www.msaco.co.in

पर्यविक्षक   **संशोधक**

डॉ. मनिषा मांजरमकर   **रामेश्वर एस. व्हंडकर**